# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** वाशिम **P.S.(ठाणे):** वाशिम

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0628 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**25/07/2025 21:56

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार
**Time Period (कालावधी):** पहर 5
**Date From (दिनांक पासून):** 25/07/2025
**Date To ( दिनांक पर्यंत):** 25/07/2025
**Time From (वेळेपासून):** 13:06 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 13:40 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 25/07/2025 **Time (वेळ):** 21:40 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 059
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 25/07/2025 21:40 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 0.5 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** पंचायत समिती कार्यालय परीसर,वाशिम, 444505

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** श्री. अक्षय वसंता मोहळे

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1994

**(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | जांभरूण परांडे,वाशिम,वाशिम ग्रामीण,वाशिम,महाराष्ट्र,444505,भारत |
| 2 | स्थायी पता | जांभरूण परांडे,वाशिम,वाशिम ग्रामीण,वाशिम,महाराष्ट्र,444505,भारत |

**(i) Occupation (व्यवसाय):**

**(j) Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9552392369

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | मयुर अंबरलाल हुमने | | | 1. व्यंकटेश सोसायटी , रिसोड रोड लाखाळा वाशिम ,वाशिम,वाशिम, वाशिम,महाराष्ट्र,भारत |
| 2 | ऋशीकेश उत्तम उगले | | | 1. काजळंबा ,वाशिम,वाशिम ग्रामीण,वाशिम,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

फिर्याद देताच त्वरीत दाखल

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

यावेळी सपोनि नागरे सा.यांनी कलम 7,12 भ्रष्टाचार प्रतिंबधक अधिनियम 1988प्रमाणे गुन्ह्याची कायमी करीवीलीफिर्याद दिनांकः-25/07/2025

नावः- श्री. अक्षय वसंता मोहळे, वय -31 वर्शे, व्यवसाय - शेती, शिक्षण-बी.ए, रा.जांभरूण परांडे,पोस्ट काटा, ता. जि.वाशिम, मो.नं.9552392369.

मी वरील ठिकाणी कुटुंबासह राहत असून वडिलोपार्जीत शेती करतो. माझे वडिलांचे वय झाल्याने शेती संबंधातील शासकीय सर्व व्यवहार मीच बघतो. दि.21/07/2025 रोजी मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग वाशिम कार्यालयात गेलो असता तेथे पो.नि.ए.एम.गायकवाड यांचे सोबत भेट झाली. मी पि.टी.ओ मयुर हुमने पं.सं.वाशिम साहेब यांचे विरुध्द तोंडी तक्रार कथन केली असता त्यांनी तात्काळ न.प.कार्यालय वाशिम येथुन 02 सरकारी पंच बोलावुन घेतले त्यानंतर मी पंचासमक्ष लेखी तक्रार दिली ती खालील प्रमाणे.

"मी ग्राम जांभरूण परांडे येथे आई, वडिल, पत्नी व मुलासह राहत असून वडिलोपार्जीत शेती करतो. माझे वडिलांचे वय झाल्याने शेतीसंबंधातील शासकीय सर्व व्यवहार मीच बघतो.

माझे वडिल नामे वसंता नामदेव मोहळे यांची ग्राम जांभरूण परांडे शेतशिवारात गट क्र.26 मध्ये 01 एकर शेती आहे व 02 एकर शेती गट क्र.34 मध्ये आहे. माझे वडिलांचे नावाने महात्मा गांधी रोजगार हमी योजने अंतर्गत शेतात सन 2023-2024 मध्ये विहीर मंजूर झाली आहे. त्यानुसार आमचे विहीरीचे संपूर्ण बांधकाम पूर्ण झाले असून त्याबाबत मस्टर हे पंचायत समिति येथे जमा केले आहे. सदर विहीरीचे बांधकाम पूर्ण झाल्याने सदर विहीर ही माझे वडिलांचे नावाने आहे ही बाब शेतीचे सातबा-यावर चढविणे महत्वाचे असते. त्याकरीता विहीर पूर्ण झालेबाबत चे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. ते प्रमाणपत्र तलाठी यांचे कडे दिल्यानंतर च विहीरीची नोंद ही सातबा-यामध्ये चढविली जाते. विहीर ग.क्र.26 मध्ये आहे.सदर विहीरीचे काम पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र हे पि.टी.ओ साहेब देतात. आमचे गावचे पिटीओ श्री मयूर हुमने साहेब यांना मी विहीर पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र देण्याकरीता वारंवार फोनवर तसेच प्रत्यक्ष भेटून संपर्क केला असता पि टी ओ साहेब माझेकडे प्रमाणपत्र देण्याकरीता पैशांची मागणी करीत आहेत. यापूर्वीदेखील मागील वर्षी माझी ईच्छा नसतांना देखील विहीरीचे बांधकाम थांबू नये म्हणून पि.टी.ओ साहेबांचे मागणीप्रमाणे ते आमचे शेतामध्ये आले असतांना 3,000/रू दिलेले आहेत.

आज दि.21/07/2024 रोजी मी, पि.टी.ओ. साहेब यांना भेटण्याकरीता पंचायत समिती वाशिम येथे गेलो असता विहीर बांधकाम पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र देण्याकरीता पिटीओ साहेब माझेकडे 2,000/रू ची मागणी करीत आहेत. सदर प्रमाणपत्र मिळण्याकरीता कोणतेही शासकीय शुल्क लागत नसल्याचे मला माहिती आहे.

माझी श्री मयुर हुमने, पि.टि.ओ, पंचायत समिती कार्यालय वाशिम जि.वाशिम यांना पैसे देण्याची इच्छा नाही किंवा माझा त्यांचेसोबत कोणताही देण्याघेण्याचा किंवा उसणवारीचा व्यवहार नसून आपसी दुष्मनी नाही. श्री मयूर हुमने यांच्यावर लाच मागणी प्रकरणात कायदेशीर कारवाई करावी या करीता मी आज रोजी तक्रार देत आहे."

मी दिलेल्या लेखी तक्रारीवर मी सही केली. तसेच मी दिलेली लेखी तक्रार वाचुन दोन्ही पंच व समक्ष म्हणुन पो. नि.अल्का गायकवाड लाप्रवि वाशिम यांनी सहया केल्या. पोनि अलका गायकवाड लाप्रवि वाशिम यांनी मला मयुर हुमने पि.टी.ओ. यांना फोन करुन विचारणा करण्याचे सांगीतले असता, मी मयुर हुमने पि.टी.ओ.यांना अंदाजे 18.00 वा दरम्यान फोन करुन भेटीसाठी कोठे येवु? अशी विचारणा केली असता मयुर हुमने पि.टी.ओ. यांनी

आता मी कार्यालयात नाही, तुम्ही उदया भेटायला या असे सांगीतल्याने पडताळणी कारवाई ही दि.22.07.2025 रोजी करण्याचे सर्वाणुमते ठरले. केलेल्या कार्यवाहीचा पडताळणी पुर्व पंचनामा तयार करण्यात आला.

दि.22.07.2025 रोजी पडताळणी करावाई दरम्यान मला, पंच क्र.01) श्री.कुणाल कनोजे यांचे सह मयुर हुमने, पि.टि.ओ, पंचायत समिती कार्यालय, वाशिम जि. वाशिम यांची भेट घेवून त्याची पडताळणी करणे करीता पाठवून पंचासमक्ष पडताळणी केली असता, माझी पंचायत समिती, वाशिम येथे मयुर हुमने, पि.टि.ओ यांचे सोबत भेट होवून बोलनी झाली. मी गैरअर्जदार मयुर हुमने पि.टी.ओ यांना सर नमस्कार सर.... प्रमाणपत्र ओके झालं का? अशी विचारणा केली असता गैरअर्जदार मयुर हुमने पि.टी.ओ हे मला म्हटले की, "पेमंट आल्यावर होईल", त्यावर मी गैरअर्जदार मयुर हुमने पि.टी.ओ यांना म्हणालो की, "पेमेंट तुम्हाल दोन तीन दिवसात करतो"... त्यावर गैरअर्जदार बोलले की, "नाही नाही क्लियर करा"... असे बोलणे झाल्यावर काही वेळ कामासंबंधी बोलणी केल्यानंतर गैरअर्जदार मला बोलले की, "पंधराशे रुपये दया" त्यावर मी त्यांना "बर करतो मग अडजेस्ट मले आजच्या दिवस फोटो देसाल का? फोटो ओरिजनल नका ना देवु"..... त्यावर गैरअर्जदार हे मला म्हणाले की, " ओरिजनल घ्या पण आज क्लियर करा".... त्यावर मी त्यांना म्हणालो "पाहयतोन काय तरी करा लागल अँडजेस्ट झाले त अर्धा एक तासात फोन करतो" त्यावर गैरअर्जदार म्हणाले की, "डायरेक्ट तसे येवु नका रिकामे".. असे बोलणी करुन मी व पंच क्र.01 सह असे लाप्रवि कार्यालय वाषिम येथे परत आलो.व्हाईस रेकॉर्डर वरिल संभाषण ऐकले असता मयुर हुमने, पि.टि.ओ यांनी माझे वडीलांच्या नावे मंजुर असलेल्या विहीर पुर्ण झाल्याचे प्रमाणपत्र देण्याचे मोबदल्यात 1500/- रुपये मागणी करुन ती स्विकारण्याची तयारी दर्षविल्याचे निश्पन्न झाले.

मयुर हुमने, पि.टि.ओ यांचे वर दि.23/07/2025 रोजी सापळा कारवाई करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. तसेच दि.23/07/2025 रोजी लाप्रवि कार्यालय वाशिम येथे येतांना मला लाच रक्कम म्हणुन देण्याकरीता 1500/रू सोबत आणणेबाबत सुचना दिल्या. दि.23/07/2025 रोजी मी ठरल्याप्रमाणे लाप्रवि कार्यालय वाशिम येथे हजर आलो असता दोन्ही पंच देखील हजर होते. पो.नि.अल्का गायकवाड यांनी मला मयुर हुमने,पि.टी.ओ.यांना देण्याकरीता 1500/- रुपये लाच रक्कम हजर करणेबाबत बोलल्या असता मी 500/-रूपये दराच्या 03 नोटा, असे एकुण 1500/-रूपये पंचासमक्ष हजर केले. सापळा कारवाई सुरु करणे अगोदर पो.नि.गायकवाड यांच्या सुचने वरुन मी मयुर हुमने, पि.टि.ओ, पं.स. वाशिम यांना फोन लावले असता त्यांनी माझे फोन उचलले नाहीत. बराच वेळ मयुर हुमने, पि.टि.ओ यांच्या फोनची वाट आम्ही सर्वांनी बघीतली असता त्यांचा फोन मला न आल्याने पो.नि. गायकवाड यांनी आम्हास सुचणा केल्या की, मयुर हुमने, पि.टि.ओ यांना जास्त फोन लावले तर त्यांना शंका येईल. म्हणुन पुढील सापळा कारवाई ही मयुर हुमने, पि.टि.ओ यांचा मला फोन येईपर्यंत स्थगीत ठेवण्यात येत आहे. दि. 23/07/2025 रोजीचा स्थगीती पंचणामा तयार करण्यात आला.

दि.25/07/2025 रोजी माझे मोबाईलवर मला मयुर हुमने, पि.टि.ओ यांनी कॉल केल्याचा नोटीफीकेषन मिळाल्याने. मी मयुर हुमने, पि.टि.ओ यांना कॉल केला असता त्यांनी मला पैसे घेऊन पंचायत समिती कार्यालय येथे येण्याचे सांगीतले. त्यानंतर पो.नी.गायकवाड यांना मी फोन लावला. माझे हुमने पि.टी.ओ यांच्याशी बोलणे झाले व त्यांनी मला पंचायत समिती कार्यालयात येण्याबाबत सांगीतल्याचे कळवीले. त्यानंतर मी ला.प्र.वि.कार्यालय वाशिम येथे हजर झालो. कार्यालयात पो.नि.गायकवाड व दोन्ही पंच हजर होते.

मला व पंच क्र.01,पंच क्र.02 यांना सापळापूर्व व सापळा पंचनाम्यामधील सुचनांची उजळणी करुन देवुन तसेच लाच रक्कम स्विकारताच मी माझे गळयातील शेला काढून हातात घ्यावा असा पुर्वनियोजित ईशारा करावा तसेच संपूर्ण सापळा पथक पंचायत समिती कार्यालय वाशिम येथे आमचे आजूबाजूलाच असणार अषा महत्त्वपूर्ण सुचना देवुन माझे शर्टाचे आतील बनियानला व्हाईस रेकॉर्डर लावुन देवुन पंच क्र.01 सह मयुर हुमने पि.टी.ओ. यांना त्यांचे मागणी केल्याप्रमाणे लाच रक्कमेसह देणे कामी रवाना केले.

मी व पंच क्र.01 असे पंचायत समिती कार्यालय वाशिम येथे पोहचलो असता त्याठिकाणी माझे अगोदार सापळा कारवाईचे पथक सापळा लावुन दबा धरुन बसल्याचे मला दिसले. पंच क्र.01 यांनी कार्यालयाचे बाहेर गाडी लावुन दिली व आम्ही दोघे पंचायत समिती कार्यालय वाशिम च्या इमारतीमध्ये गेलो असता. रोजगार हमी विभाग, मध्ये मयुर हुमने पि.टी.ओ. हे बसलेले होते व त्यांच्या टेबल समोर एक व्यक्ती बसला होता. मी, मयुर हुमने पि.टी.ओ. यांना नमस्कार केला व माझे प्रमाणपत्र झाले का या बद्दल विचारणा केली. मयुर हुमने पि.टी.ओ यांनी त्याच्या टेबल समोर बसलेल्या इसमाजवळ पैसे देण्याचे सांगीतले. त्यामुळे मी त्यांना पंचायत समिती च्या समोरील चहा च्या टपरीवर घेऊन गेलो. मी त्याना त्यांचे नाव विचारले असता त्यांनी मला त्यांचे नाव उगले असल्याचे सांगीतले. उगले यांनी मला पैसे कसे देणार फोन पे की कॅश असे विचारले असता मी त्यांना कॅश असल्याचे सांगीतले. चहा पिल्यानंतर चहा टपरीच्या बाजुला पंचायत समिती कार्यालयाच्या गेटसमोर, मी 1500/- रुपये उगले यांचे कडे दिले व मोजुन घ्या असे म्हटले त्यावर उगले मला म्हटले की, ठिक हे... धुडडा कहाचा हे....का पावडर लावुन आणली?

असे बोलुन लाच रक्कम स्विकारली. मी ठरल्याप्रमाणे माझे गळयातील शेला गळयातुन काढुन हातात घेवुन लाच रक्कम स्विकारलेबाबत पूर्व नियोजीत इशारा केला. त्यावरून तात्काळ पो.नि.गायकवाड,सापळा पथक आमचे जवळ आले व ग्रामरोजगार सहायक उगले यांना 1500/रू लाच रक्कमेसह ताब्यात घेवुन त्यांच्या कडुन लाच रक्कम हस्तगत केली व सापळा पथकामधील पोउपअधि परदेशी व स्टाफ यांनी पंचायत समिती कार्यालयात हजर असलेल्या मयुर हुमने पि.टी.ओ. यांना ताब्यात घेतले व पुढिल कारवाई करीता लाप्रवि कार्यालय वाशिम येथे आणण्यात आले.

ईलोसे मयुर अंबरलाल हुमने, वय-34 वर्ष, व्यवसाय-पालक तांत्रिक अधिकारी (PTO), पंचायत समिती कार्यालय वाशिम, रा.व्यंकटेश सोसायटी, रिसोड रोड लाखाळा वाशिम यांनी माझे वडीलांच्या नावे मंजुर असलेल्या विहीरीचे बांधकाम पुर्ण झाल्याचे प्रमाणपत्र देण्याकरीता पडताळणी कारवाई दरम्यान दि.22/07/2025 रोजी 1500/- रुपये लाचेची स्पष्ट मागणी करुन आज दि.25/07/2025 रोजी सापळा कारवाई 13.06 वा. ते 13.40 वा. दरम्यान ऋशीकेश उत्तम उगले, वय 27 वर्षे व्यवसाय- ग्रामरोजगार सहायक, काजळंबा. रा. काजळंबा ता.जि. वाशिम यांचे जवळ लाच रक्कम देण्याचे सांगीतले व ग्रामरोजगार सेवक ऋशीकेश उत्तम उगले यांनी 1500/- रुपये लाच रक्क्म पंचासमक्ष स्विकारली.

म्हणुन ईलोसे 01) मयुर अंबरलाल हुमने, वय-34 वर्ष, व्यवसाय-पालक तांत्रिक अधिकारी (PTO),पंचायत समिती कार्यालय वाशिम, रा.व्यंकटेश सोसायटी,रिसोड रोड लाखाळा वाशिम व ईलोसे 02) ऋशीकेश उत्तम उगले, वय 27 वर्षे व्यवसाय- ग्रामरोजगार सहायक, काजळंबा. रा. काजळंबा ता.जि. वाशिम यांचे विरुध्द माझी कायदेषिर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद पोहवा योगेश खोटे लाप्रवि वाशिम यांनी टंकलिखीत केली असुन मी वाचून पाहली. माझे सांगणे प्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष सही

(अल्का एम गायकवाड ) ( श्री. अक्षय वसंता मोहळे )
पोलीस निरीक्षक रा.जांभरूण परांडे, पोस्ट काटा, ता.जि.वाशिम
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वाशिम.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
Arun Badriprasad Nagre
**Rank (पद):** I (Inspector) **No.(क्र.):** API
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

ड्युटी ऑफिसर
पो.स्टे. वाशिम (शहर)

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** Devendrasinh Bahac
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):**